६८२

**परिपत्रक :-**

जा.क्र.पणन-५/कृउबास/परिपत्रक/तोलाई/५०कि.पो.दर/१६
पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालय,
३ रा मजला, नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे — ४११ ००१
दि :- ~~जानेवारी~~, २०१६
०१ फेब्रुवारी,

वाचावे:-
१. शासनाकडील क्र.कृबास०२११/प्र.क्र.४०/११स, दि. ०५.०२.२०११ चे पत्र.
२. शासनाकडील क्रमांक:कृबास०११६/प्र.क्र.१०६/११स, दि. २९.०१.२०११ चे पत्र.
३. मा मंत्री (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली दि २८/०१/२०१६ रोजी आयोजीत झालेली बैठक.

**विषय:- राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये ५० किलो पेक्षा ज़ास्त वजनाच्या पोत्यांची चढउतार हाताळणेबाबत...**

उपरोक्त विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

२. उक्त नमूद विषयाचे अनुषंगाने आंतरराष्ट्रीय श्रमसंघटनेने केलेले कन्व्हेंशन त्या अनुषंगाने केंद्र शासनाने तसेच राज्य शासनाने (कामगार विभाग) यांनी वेळोवेळी कामगारांकडून ५० किलो पेक्षा जास्त वजनाच्या मालाची हातळणी करून घेण्यात येऊ नये अशा सूचना निर्गमित केलेल्या आहेत. ५० किलोपेक्षा जास्त वजनाचे शेतमालाची कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये माथाडींकडून चढ-उतार करणे संबंधीतांचे आरोग्याचे दृष्टीने घातक आहे. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने देखील याबाबत निर्देश दिलेले आहेत. परंतु त्याची अंमलबजाणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे स्तरावरून काटेकोरपणाने होत नसल्याबाबत दिसून आलेले आहे.

तरी याबाबत आपणांस पुनश्च: सूचित करण्यात येते की, आपल्या अधिनस्त असलेल्या कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये माथाडींमार्फत ५० किलो पेक्षा अधिक वजानाच्या गोण्यांमधून मालाची चढ-उतार होणार नाही याबाबतची दक्षता घेण्यांत यावी. व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी होत आहे याबाबतचे सनियंत्रण करावे. सदरची बाब तात्काळ आपले अधिनस्त सर्व कृषी उत्पन्न बाजार समितीचे व त्यामधील बाजार घटकांचे निदर्शनास आणून देण्यात यावी.

**पणन संचालक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

**प्रत माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना -**
१. विभागीय सहनिबधक, सहकारी संस्था (सर्व)
२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
३. सभापती / सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती (सर्व)

**प्रत माहितीस्तव —**
कक्ष अधिकारी (११-स) सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभाग, मंत्रालय, मुंबई — ३२